याद्वारे सूचना देण्यात येते की, **स्वर्गीय श्री. वेरशी भिमशी गडा** यांचे सर्व वारस व कायदेशीर प्रतिनिदी १) श्रीम. अमृताबेन वेरशी गडा, २) श्री. अशोक वेरशी शाह गडा, ३) श्री. परेश वेरशी गडा, ४) श्रीम. विमला अमरशी गाला, ५) श्रीम. नयना प्रेमजी सत्रा व ६) श्रीम. उषा विनोद शाह यांनी शेअर सर्टिफिकेट नं. ५२ अन्वये विभिन्न क्रमांक २५६ पासून ते २६० (दोन्ही समाविष्ट) **लक्ष्मी निवास को- ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेडच्या** प्रत्येकी रु. ५०/- च्या पूर्ण प्रदान केलेल्या (५) पाच शेअर्ससह एकत्रित एन. एम. जोशी मार्ग, कबुतर पाडा, भायखळा, मुंबई-४०० ०२७ येथे स्थित सी.एस. नं. १९५२ धारक भायकळा विभाग स्थित उभ्या व लक्ष्मी निवास म्हणून ज्ञात बिल्डिंगच्या बी विंगमधील ४ थ्या मजल्यावरील मोजमापित २२५ चौ. फूट किंवा त्या आसपासचे बिल्टअप क्षेत्र मालकीचा निवासी फ्लॅट धारक क्रमांक बी ४०९ माझ्या अशिलांना विकला आहे.

उपरोक्त संदर्भातील फ्लॅटच्या व शेअर्सच्या संदर्भात विक्री, अदलाबदल, गहाण, प्रभार, बक्षीस, विश्वस्त, वारसाहक्क, देखभाल, कब्जा, भाडेपट्टा, धारणाधिकार, पालक हितसंबंध किंवा अन्य कोणत्याही मार्गाने कोणताही दावा असणाऱ्या सर्व व्यक्तींनी ते लेखी स्वरूपात निम्नस्वाक्षरीकारांना त्यांचे ऑफिस शॉप नं. १, गाला टॉवर, भाई बाल मुकुंद मार्ग, चिंचपोकळी पूर्व, मुंबई-४०० ०१२ येथे ह्या सूचनेच्या प्रकाशनापासून ७ दिवसांत पुराव्यासह त्याप्रती उचित पावती घेऊन किंवा रजिस्टर्ड ए/डी पोस्टाने कळविणे ही याद्वारे विनंती असून कसूर झाल्यास जर अशा व्यक्तींचे काही दावे असल्यास ते त्यागित आणि/किंवा परित्यागित मानण्यात येतील आणि त्या प्रकरणी पुढील कोणत्याही संदर्भाशिवाय विक्री/हस्तांतरण पूर्ण केले जाईल.

मुंबई, दिनांक ९ जुलै, २०१८
**(अनुज बलिया)**
वकील

## जाहीर सूचना

**सोनी पिक्चर्स नेटवर्क्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड** (CIN: U92100MH1995PTC111487), ह्यांच्याद्वारे, ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय इंटरफेस इमारत क्र.७, ४ था मजला, ऑफ मालाड लिंक रोड, मालाड (प), मुंबई-४०० ०६४ येथे आहे, त्यांच्या चॅनेल्सचे ब्रॉडकास्टर्स (प्रसारक) म्हणून आणि टीव्ही टुडे नेटवर्क लिमिटेडच्या वतीने प्राधिकृत एजन्टच्या क्षमतेमध्येही त्यांच्या सर्व किंवा काही चॅनेल्सच्या सिग्नल्सच्या संबंधात जाहीर नोटीस निर्गमित करण्यात येत आहे.

अ. **सोनी पिक्चर्स नेटवर्क्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड** ज्यांच्याकडे पुढील चॅनेल्स म्हणजेच सेट, सब, पल, सेट मॅक्स, मॅक्स२, सोनी वाह, सेट पिक्स, मिक्स, सिक्स, सोनी ईएसपीएन, टेन१, टेन२, टेन३, एएक्सएन, सोनी बीबीसी अर्थ, सोनी ये !, सोनी आठ, सेट एचडी, सब एचडी, मॅक्स एचडी, पिक्स एचडी, ले प्लेक्स एचडी, सोनी रॉक्स एचडी, सिक्स एचडी, सोनी ईएसपीएन एचडी, टेन १ एचडी, टेन २ एचडी, टेन ३ एचडी, टेन गोल्फ एचडी, एएक्सएन एचडी आणि सोनी बीबीसी अर्थ एचडी **("एसपीएन चॅनेल्स")** हे चॅनेल्स आहेत.

ब. **टीव्ही टुडे नेटवर्क लिमिटेड** ज्यांच्याकडे पुढील चॅनेल्स म्हणजेच आज तक, इंडिया टुडे आणि तेझ **("टीव्हीटीएन चॅनेल्स")** हे चॅनेल्स आहेत.

खाली उल्लेख करण्यात आलेल्या मल्टी सिस्टम चालकाच्या (चालकांच्या)/केबल चालकाच्या (चालकांच्या) आणि त्यांच्या फ्रॅन्चायझीजच्या सब्स्क्राइबर्सना हे कळविण्यात येत आहे की वरील ब्रॉडकास्टर्सच्या (लागू असेल त्याप्रमाणे) सब्स्क्राइब्ड टेलिव्हिजन चॅनेल्सचे सिग्नल्स हे खाली देण्यात आलेल्या कारणांसाठी आजपासून तीन आठवड्यांनंतर खंडित केले जाण्याची शक्यता आहे:

| अनु. क्रमांक | मल्टी सिस्टम चालकाचे (चालकांचे)/केबल चालकाचे (चालकांचे) नाव व शहर | खंडित करावयाचे चॅनेल्स | प्रभावित डीएएस क्षेत्र/क्षेत्रे ("प्रदेश") | कारण (कारणे) |
|---|---|---|---|---|
| १ | स्पेस व्हिजन डिजिटल नेटवर्क प्रा. लि., दापोडे | एसपीएन चॅनेल्स आणि/किंवा टीव्हीटीएन चॅनेल्स | भिवंडीचा भाग (गोकूळ नगर, निझामपूर, वन्जापती नाका, नाडी नाका, कल्याण रोड-शांतीनगर, नारपोळी, दावीज नगर, अंजूर फाटा, भोईवाडा, सुतार आळी,, करवली गाव, गुंडवली गाव, धामणकर नाका), उरणचा भाग (डोंगरी, पंजा, बोकडवीरा, एमएसईबी कॉलनी, नेव्ही, नागाव, उरण बाजारपेठ, मोरा, भावरा), नागोठाणे व पुडूस, [illegible] कसारा, वाड्याचा भाग, रत्नागिरीचा भाग. | थकीत देय रकमेचा भरणा न करणे आणि/किंवा कराराची अंमलबजावणी न करणे, यथास्थितीनुसार |
| २ | ओईएम दत्ता चिले केबल नेटवर्क; पाटन | एसपीएन चॅनेल्स आणि/किंवा टीव्हीटीएन चॅनेल्स | पाटन, नवा रस्ता, यारफले, अडूल, गुजरवाडी, शिंदेवाडी, धका, वांजुले, दिवशी. | थकीत देय रकमेचा भरणा न करणे आणि/किंवा कराराची अंमलबजावणी न करणे, यथास्थितीनुसार |
| ३ | अजंठा केबल नेटवर्क; वैजापूर | एसपीएन चॅनेल्स | महाराष्ट्र राज्यामधील वैजापूर, औरंगाबाद डीएएस टप्पा III अधिसूचित क्षेत्रे. | थकीत देय रकमेचा भरणा न करणे आणि/किंवा कराराची अंमलबजावणी न करणे, यथास्थितीनुसार |
| ४ | के.बी.के.नेटवर्क; कन्नड | एसपीएन चॅनेल्स | सम्राट इमारत, वाकी, चिंचोली, कारंजखेडा, नागापूर, नेव्रपूर, टाकली. | थकीत देय रकमेचा भरणा न करणे आणि/किंवा कराराची अंमलबजावणी न करणे, यथास्थितीनुसार |
| ५ | श्री बालाजी केबल नेटवर्क; सांगली- मिरज कुपवाड | एसपीएन चॅनेल्स | ब्राह्मणपुरी, सुभाषनगर, माणिकनगर, शिवागीनगर, भारतनगर, बालाजीनगर आणि रामउद्यान, मालेगावचा भाग, महिसाल, कुपवाडचा भाग, विश्रामबागचा भाग. | थकीत देय रकमेचा भरणा न करणे आणि/किंवा कराराची अंमलबजावणी न करणे, यथास्थितीनुसार |

उपरोल्लिखित मल्टी सिस्टम चालकाद्वारे (चालकांद्वारे)/केबल चालकाद्वारे (चालकांद्वारे) आणि त्यांच्या संबंधित फ्रॅन्चायझीजद्वारे सेवा प्रदान करण्यात येणाऱ्या सर्व क्षेत्रांवर ह्याचा परिणाम होईल.

## जाहिर नोटीस

या नोटीसव्दारे असे जाहिर करण्यात येते की, स्वप्नपुर्ती को. ऑप. हौ. सोसायटीचे सभासद कै. श्री. सुभाष धोंडीराम सुंभे यांचे निधन झालेले आहे. त्यांनी निधनापूर्वी वारसा हक्क कोणाला न दिल्याने त्यांच्या या नोटीसीव्दारे तपास करण्यात येत आहे. तरी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत वारसदारांनी आपला वारसा हक्क कागदपत्रांच्या पुराव्यासहीत सोसायटी कार्यालयामध्ये सायंकाळी ८ ते १० या वेळेत येऊन भेटावे. त्यावेळी त्यांनी नोंदी व उपविधीची प्रत दाखविण्यात येईल. ही मुदत नोटीस दिलेल्या तारखेपासुन मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत असेल.

रुम नं. ६०३
कै. श्री. सुभाष धोंडीराम सुंभे
मृत्यु :१६.०३.२०१८
स्वप्नपुर्ती को.ऑप.
हौ. सोसायटी,
दि. १०/०७/२०१८ सचिव

## asianpaints

**एशियन पेंट्स लिमिटेड**
सीआयएन : L24220MH1945PLC004598
नोंदणीकृत कार्यालय : ६अ, शांतीनगर, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५
संकेतस्थळ : www.asianpaints.com; ई-मेल: investor.relations@asianpaints.com
दूरध्वनी क्र. : (०२२) ६२१८ १००० फॅक्स क्र. : (०२२) ६२१८ ११११

### सूचना

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिसक्लोजर रिक्वायमेंट्स) नियम, २०१५ मधील नियम ४७ सोबत वाचले असता नियम २९ अन्वये ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, खालील बाबी विचारात घेण्याकरिता तसेच मंजुरीसाठी **मंगळवार, २४ जुलै, २०१८** रोजी कंपनीच्या संचालक मंडळाची सभा होणार आहे:

१. ३० जुन, २०१८ रोजी संपलेल्या तिमाही करिता कंपनीचे लेखापरीक्षित स्वतंत्र वित्तीय निष्कर्ष; आणि
२. ३० जुन, २०१८ रोजी संपलेल्या तिमाही करिता कंपनीचे अलेखापरीक्षित एकत्रिकृत वित्तीय निष्कर्ष.

जेथे कंपनीची समभाग नोंदणी आहे अशा स्टॉक एक्स्चेंजच्या बीएसई लिमिटेड (**www.bseindia.com**) आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (**www.nseindia.com**) च्या वेबसाईटवर आणि कंपनीच्या वेबसाईटवर (**www.asianpaints.com**) देखील ही सूचना उपलब्ध आहे.

**एशियन पेन्ट्स लिमिटेडच्या वतीने आणि करिता**
स्वाक्षरी/-
**के बी एस आनंद**
ठिकाण : मुंबई
दिनांक : ९ जुलै, २०१८
**व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ**

## अपना सहकारी बँक लि. (मल्टी स्टेट शेड्यूल्ड को-ऑप. बँक)

अपना बँक — अपना सहकारी बँक लि. APNA SAHAKARI BANK LTD. — आपलि माणसं- आपलि बँक — मल्टी स्टेट शेड्युल्ड बँक

**नोंदणी कार्यालय :** अपना बाजार, १०६-ए, नायगांव, मुंबई ४०००१४.
**कॉर्पोरेट कार्यालय :** अपना बँक भवन, डॉ. एस. एस. राव रोड, परेल, मुंबई ४०० ०१२.
दुरध्वनी :- ०२२-२४१६ ४८६० / २४१० ४८६१- ६२/२४११ ४८६३. विस्तार १०८, १०९, १११

### विक्रीबाबत जाहिर सूचना

सिक्यूरीटायझेशन अॅण्ड रिकन्सट्रक्शन ऑफ फायनानशियल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्यूरीटी इंटरेस्ट वटहूकूम २००२ -(सरफायसी कायदा) सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ अन्वये बँकेच्या ताब्यात असलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीबाबत **''जेथे आहे आणि जसे आहे''** या तत्वावर विक्री कारवाई करीत आहे.

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव | जामिनदार | येणेबाकी रक्कम | मालमत्तेचा तपशिल | राखीव किंमत | इसारा अनामत रक्कम | बोली वाढ रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **श्री. खंडू नागनाथ भोसले (कर्जदार) सौ. सुजाता खंडू भोसले (सह-कर्जदार)** | श्री. के. साजी कुमार नायर, श्री. अंकुश मनोहर कर्चे | दि.३०.०६.२०१८ रोजी येणे असलेली रक्कम रु.२३,५४,१८७.६० (रुपये तेवीस लाख चौपन्न हजार एकशे सत्याऐंशी आणि पैसे साठ फक्त) सोबत दि.०१.०७.२०१८ पासूनचे पुढील होणारे व्याज | फ्लॅट नं. ए-७०१, कोलंबिया, कासा रियो कॉम्प्लेक्स, गाव – निलजे, हायवे समोर, डोंबिवली. | रु. २८२८७००.०० | रु. २८२८७०.०० | रु. ५००००.०० |

**ता. क. :–** अपना सहकारी बँकेच्या माहितीनुसार उपरोक्त मालमत्तेवर अपना सहकारी बँकेच्या व्यतिरिक्त कुठलाही बोजा नाही.

* उपरोक्त स्थावर मालमत्तेकरिता असणारी कायदेशीर देणी, मालमत्ता कर, विक्री कर, एक्साईज ड्यूटी, सेज शुल्क, डॉक्युमेंटसाठीचे शुल्क, हस्तांतर शुल्क, प्रवास शुल्क, स्टॅमड्युटी, रजिस्ट्रेशन फी , टीडीएस इ. काही शिल्लक असल्यास यशस्वी बोलीदाराने भरणे बंधनकारक असेल.

**अटी व शर्ती**

१. सदर विक्री या जाहिरातीत आणि निर्धारित निविदेतील कागदपत्रांमध्ये असलेल्या अटी व शर्ती आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम २००२ आणि सरफायसी कायद्या नुसारच होईल. मालमत्ता विक्रीकरिता विहित निविदा अपना सहकारी बँकेच्या कॉर्पोरेट ऑफिस, अपना बँक भवन, डॉ. एस. एस. राव रोड, परेल- ४०००१२ वसुली विभागात सोमवार ते शुक्रवार दरम्यान **दि.०४.०८.२०१८** पर्यंत स. १०.०० ते सायं. ६.०० या वेळेत उपलब्ध असतील.
२. मालमत्तेचे निरीक्षण अथवा तपासणी **दि.३०.०७.२०१८ व दि.३१.०७.२०१८ रोजी** सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत देण्यात येईल. कृपया नोंद घ्यावी की अपना सहकारी बँक लि.ला पूर्व सूचना देऊन व त्यांचेकडून वेळ निश्चिती झाल्यावरच प्रत्येक बोलीदाराला एकापेक्षा अधिक वेळा तारणाची पाहणी व तपासणी करता येणार नाही.
३. इच्छुक बोलीदारांनी राखीव किंमतीच्या १० % बयाणा रक्कम एनइएफटी /आरटीजीएस मार्फत खाते क्रमांक : ०९८००२००१०००३२ सरफायसी कायद्याअंतर्गत खाते श्री खंडू नागनाथ भोसले यांच्या मिळकतीची विक्री, ईएमडी खाते, अपना सहकारी बँक लि., परेल, मुंबई – १२ आयएफएससी कोड: ASBL0000002 वर **दि.०९.०८.२०१८ रोजी सायं. ०५.०० वा.** पर्यंत जमा करावी. रोख/चेक/डीमांड ड्राफ्ट द्वारे इसारा ठेव स्विकारली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.
४. **दि.१३.०८.२०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजता** अपना सहकारी बँक लि., कॉर्पोरेट ऑफिस, अपना बँक भवन , डॉ. एस,एस,राव रोड, परेल – ४०० ०१२ या पत्त्यावर निम्नस्वाक्षरीकाराकडून विहीत वेळेत प्राप्त झालेल्या निविदा उघडण्यात येतील. निविदाकार स्वत: उपस्थित राहून निविदा उघडल्यानंतर प्रस्तावाची रक्कम वाढवू शकतील.
५. इच्छा असल्यास, निविदा कागदपत्रात नमूद केलेल्या व या नोटीसीत उल्लेखिलेल्या अटी व शर्ती पूर्ण होत असल्यास कर्जदार/जामिनदारही या लिलाव प्रक्रीयेत सहभागी होऊ शकतील.
६. यशस्वी बोलीदार /देकारकर्ते यांनी पुढील एक दिवसाच्या आत अथवा अधिकृत अधिकारी यांनी वाढवून दिलेल्या मुदतीत २५% रक्कम भरावी व उर्वरित रक्कम निविदा उघडण्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत भरावी.
७. जर यशस्वी बोलीदार उर्वरीत ७५% रक्कम मिविदा उघडण्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत अथवा अधिकृत अधिकारी यांनी वाढवून दिलेल्या मुदतीत, रोखीने अथवा डीडी अथवा आरटीजीएस/एनईएफटी द्वारा भरण्यास अयशस्वी ठरले, तर बयाणा रक्कम जप्त केली जाईल.
८. सर्वोच्च बोली स्विकारण्यास अधिकृत अधिकारी बांधील नाहीत आणि कोणतीही किंवा सर्व बोली स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार किंवा लिलाव कोणतेही कारण न देता तहकूब करण्याचा/पुढे ढकलण्याचा/रद्द करण्याचा अधिकार अधिकृत अधिकारी राखून ठेवत आहेत.
९. सर्व प्राप्त निविदा उघडल्यानंतर इच्छुक बोलीदारांना मा. अधिकृत अधिकारी यांचे इच्छेनुसार एकमेकात चर्चा करुन निविदा रक्कम वाढविण्याची संधी मिळू शकते
१०. वर उल्लेखिलेल्या दिनांकास व वेळेत मिळकत पाहण्याची परवानगी मिळेल.
११. सदर नोटीस ही कर्जदार/जामीनदार यांना तारण मिळकतीची लिलावाने विक्री केली जात असल्याची नोटीसही समजावी.
अधिक माहितीकरता पुढील क्रमांकावर संपर्क साधा. २४१० ४८६१, २४१० ४८६२, २४११ २०६५ विस्तारीत १०८, १०९, १११

### सरफायसी कायदा २००२ च्या अन्वये ३० दिवसांची वैधानिक सूचना

कर्जदार/ जामीनदार यांना या नोटीशीद्वारे सूचित करण्यात येते की सरफायसी कायदा कलम १८ च उप कलम ८ नुसार त्यांनी लिलावाचे तारखेपूर्वी कधीही सर्व येणे रक्कम/खर्च/शुल्क इत्यादीचा भरणा करावा. अन्यथा वर उल्लेखिल्याप्रमाणे सदर मालमत्ता लिलावाद्वारे विक्री करण्यात येऊन, जर त्यातून संपूर्ण रकमेची परतफेड झाली नाही तर उर्वरित रक्कम व्याज खर्चासह वसूल करण्यासाठी बँक पुढे कार्यवाही करेल.

सही/-
**दिनांक : १०.०७.२०१८** **अधिकृत अधिकारी**
**ठिकाण : मुंबई** **कॉर्पोरेट ऑफिस**

## PUBLIC NOTICE

NOTICE given to public at large I, Nafisa Contractor alias Nafisa A Ebrahim, am not living with my husband Mr. Aslam Mohammed Ebrahim since 27.02.2016. I am presently living at my self owned residence viz. B-1203 Crown, Hiranandani Estate, G B Road, Thane, West 400 607. Hereinafter referred to as "said flat". I own a shop being Unit No. G-18, "Flora", Hiranandani Estate, G B Road, Thane West 400607 where I run "Bellpepper". my eatery business. Hereinafter referred to as the "said shop".

My husband Aslam Ebrahim has no right, title and interest in respect of said flat and shop as they are owned and managed by me. I apprehend that there are banks, financial institutions/ creditors from whom my said husband may have taken loans and/or financial facilities which seem to have not been paid by him. I declare that neither I nor my said flat and shop are concerned with my said husband. I have not stood as a guarantor or surety whatsoever before any financial institution, bank or any individual creditor of my said husband. I hereby caution public at large that whoever be it bank, financial institution, money lenders or individual creditors of my said husband, if dealing with him shall do so at their own risk. Neither I nor my aforesaid flat and shop shall be liable and/or subjected to any claim, lien, charge, attachment of/by any bank, individual or entity.

Dated this 10th day of July, 2018

S/d-
Place : Mumbai (Nafisa Contractor)
Date : 10-07-2018

## Mahindra MUTUAL FUND

**MAHINDRA ASSET MANAGEMENT COMPANY PRIVATE LIMITED**
Corporate Identity Number: U65900MH2013PTC244758
**Registered Office :** "A" Wing, 4th Floor, Mahindra Towers, Dr. G.M Bhosale Marg, P.K. Kurne Chowk, Worli, Mumbai 400 018
**Corporate Office:** 1st Floor,Sadhna House, 570, P.B Marg, Worli, Mumbai – 400 018
Tel: 1800 419 6244; website:www.mahindramutualfund.com; email id: mfinvestors@mahindra.com

### NOTICE - CUM –ADDENDUM NO. 20/2018

**THIS NOTICE - CUM – ADDENDUM SETS OUT CHANGES TO BE MADE IN THE STATEMENT OF ADDITIONAL INFORMATION (SAI), SCHEME INFORMATION DOCUMENT(SID) AND KEY INFORMATION MEMORANDUM (KIM) OF THE SCHEMES OF MAHINDRA MUTUAL FUND (FUND)**

**Change in the address of Official Point of Acceptance of Transactions ('OPAT') for the schemes of the Fund**

Investors/Unit holders are advised to take note of changes in the addresses of the following Investor Service Centres, of Computer Age Management Services Private Limited (the Registrar and Transfer Agent to the schemes of the Fund) which is the OPAT for the schemes of the Fund.

| State | Old Location Address | New Location Address | Effective Date |
|---|---|---|---|
| Gujarat | 3rd Floor, T - 11, Opp. Goverment Quarters College Road, Palanpur - 385001 | Gopal Trade Center, Shop No. 13-14, 3rd Floor, Nr. BK Mercantile Bank, Opp. Old Gunj, Palanpur - 385001 | July 16, 2018 |
| Uttarakhand | Shop No. 3, Second Floor, The Mall Cross Road, A.D. Chowk Bank Road, Gorakhpur - 273001 | Shop No. 5 & 6, 3rd Floor, Cross Road The Mall, A D Tiraha, Bank Road, Gorakhpur – 273001 | |

This notice-cum- addendum shall form an integral part of the SAI / SID / KIM of the scheme(s) of the Fund as amended from time to time.


All other terms and conditions of the SAI/SIDs and KIMs of the schemes the Fund will remain unchanged

**For Mahindra Asset Management Company Private Limited**
**Sd/-**
**Place: Mumbai**
**Date : July 9, 2018** **Authorised Signatory**
CNo.00394

**Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.**

पावसाळी अधिवेशन 2018

# संभाजी भिडेंच्या 'मनू श्रेष्ठ'वरून विधानसभेत विरोधक आक्रमक



**मुंबई : संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्यापेक्षा मनू श्रेष्ठ होता, या संभाजी भिडे यांच्या वक्तव्यावरून सोमवारी विधानसभेत विरोधक आक्रमक झाले. या विधानाशी सरकार सहमत नसेल तर त्यांच्याविरुद्ध कारवाई करावी आणि सहमत असेल तर सभागृहात ठराव मांडून मनुस्मृती भारतीय संविधानापेक्षा श्रेष्ठ असल्याचे जाहीर करावे, अशी उपरोधिक टीका विधानसभेतील विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केली आहे. पुरोगामी महाराष्ट्रासाठी हे विधान चुकीचे असून, संभाजी भिडे यांच्यावर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानसभेचे नेते अजित पवार यांनी केली. त्यांच्या संतप्त भावना लक्षात घेऊन संभाजी भिडे यांच्या विधानाची व्हिडीओ क्लीप तपासून पाहू. त्यात असंवैधानिक आढळल्यास कारवाई करू, असे अश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.**



## नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी

**नागपूर :** पदवीधर व शिक्षक मतदारसंघातून महाराष्ट्र विधान परिषदेवर सदस्य म्हणून निवडून आलेल्या चार नवनिर्वाचित सदस्यांना विधान परिषदेचे सभापती रामराजे नाईक-निंबाळकर यांनी सोमवारी विधान परिषदेत शपथ दिली. या नवनिर्वाचित सदस्यांमध्ये कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक मतदारसंघ), निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर मतदारसंघ), किशोर दराडे (नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघ), विलास पोतनीस (मुंबई विभाग पदवीधर मतदारसंघ) यांचा समावेश आहे. यावेळी सभागृह नेते तथा महसूल मंत्री चंद्रकांत पाटील, विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे व इतर सदस्य उपस्थित होते.

## विनाअनुदानित शिक्षकांना पगार देण्याची जबाबदारी संस्थेची – तावडे

**नागपूर :** महाराष्ट्र खासगी शाळेतील कर्मचारी विनियमन अधिनियम १९७७मधील नियम ४ (३) नुसार विनाअनुदानित शिक्षकांना वेतन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेचीच असल्याचे शालेय शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी विधानपरिषदेत सांगितले. वि. प. सदस्य डॉ. सुधीर तांबे, शरद रणपिसे, संजय दत्त यांनी उपस्थित केलेल्या उच्च माध्यमिक शाळांच्या वर्ग व तुकड्या अनुदानास पात्र म्हणून घोषित करण्याबाबतच्या प्रश्नावर तावडे यांनी खुलासा दिला. शासन निर्णय २६ फेब्रुवारी २०१४ अन्वये 'कायम विनाअनुदान' तत्त्वावर परवानगी दिलेल्या उच्च माध्यमिक शाळांचा 'कायम' हा शब्द वगळण्यात आला आहे. शासन निर्णय २८ फेब्रुवारी २०१८ अन्वये 'कायम विनाअनुदान' तत्त्वावर परवानगी दिलेल्या १२३ उच्च माध्यमिक शाळा आणि २३ उच्च माध्यमिक शाळांमधील अतिरिक्त शाखा व तुकड्यांना विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून अनुदानासाठी पात्र घोषित करण्यात आले आहे. उर्वरित उच्च माध्यमिक शाळा, अतिरिक्त शाखा व तुकड्यांची क्षेत्रीयस्तरावर तपासणीची कार्यवाही सुरू असल्याचे तावडे यांनी स्पष्ट केले.



## मुंबईतील विद्यार्थ्यांना स्थानिक कॉलेजमध्येच प्रवेश द्या : राज पुरोहित

**नागपूर :** स्थानिक विद्यार्थ्यांना स्थानिक कॉलेजमध्येच प्रवेश देण्यात यावा, कारण मुंबईतील विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये जाण्यासाठी लांब प्रवास करावा लागतो. त्यांना बस, ट्रेन बदलून जावे लागते, त्यांची ऊर्जा प्रवासातच खर्च होत असल्याचे आमदार राज पुरोहित यांनी सांगितले. विधानभवन परिसरात प्रसार माध्यमाशी ते बोलत होते. शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी ही समस्या सोडवण्याकरिता एक समिती गठित करावी. त्यात विधी सचिव, शिक्षण सचिव, प्रधान सचिव यांना घ्यावे. समितीने यासंदर्भात निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. ते म्हणाले, मुलुंडच्या विद्यार्थ्यांना अंधेरी येथील कॉलेजमध्ये प्रवेश दिला जातो. अंधेरीतील विद्यार्थ्यांना चर्चगेट परिसरातील कॉलेजमध्ये प्रवेश दिला जातो. चर्चगेटपासून अंधेरीला जाण्यासाठी विद्यार्थी बसमध्ये बसतो. नंतर त्याला वाटेत बस सोडून कॉलेजमध्ये जाण्यासाठी लोकल ट्रेनमध्ये बसावे लागते. ही कसरत त्याला घरी येतानाही करावी लागते. कॉलेजमधून घरी येताना विद्यार्थ्यांना रात्र होते. प्रवासातच दमून गेल्यावर तो घरी येऊन कसा काय अभ्यास करणार? त्यामुळे काही विद्यार्थ्यांनी अर्ध्यातून शिक्षण सोडून दिले आहे, असे त्यांनी सांगितले.



## ...तर मनुस्मृतीला संविधानापेक्षा श्रेष्ठ जाहीर करा –विखे-पाटील



**नागपूर :** ज्ञानोबा-तुकोबापेक्षा मनू एक पाऊल पुढे होता, असे संभाजी भिडे यांनी विधान केले. या विधानाशी सरकार सहमत नसेल, तर त्यांच्याविरुद्ध कारवाई करावी आणि सहमत असेल, तर सभागृहात ठराव मांडून मनुस्मृती भारतीय संविधानापेक्षा श्रेष्ठ असल्याचे जाहीर करावे, अशी उपरोधिक टीका विधानसभेतील विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केली आहे. ज्ञानोबा-तुकोबापेक्षा मनूला मोठे ठरवणाऱ्या संभाजी भिडेंवर आणि त्या अनुषंगाने सरकारवर सडकून टीका करताना विखे-पाटील म्हणाले, संभाजी भिडे सातत्याने कायद्याच्या चिंधड्या उडवत आहेत. ही भूमिका सरकारला मान्य आहे का? समाजातील वाईट चालीरीती, रूढींवर प्रहार करणारी, समतेची शिकवण देणारी आपली थोर संतपरंपरा कुठे आणि विषमतेची बिजे रोवणारी, समाजाला प्रतिगामी बनविणारी मनुस्मृती कुठे? असे प्रश्न विखे-पाटील यांनी उपस्थित केले. गेल्या वर्षीच्या वारीत त्यांनी नंग्या तलवारी नाचवल्या होत्या; परंतु त्यांच्याविरुद्ध कारवाई झाली नाही. भीमा-कोरेगावच्या हिंसाचारात त्यांची भूमिका संशयास्पद होती. परंतु त्यांच्याविरुद्ध कारवाई झाली नाही. मनुस्मृतीचा उदो-उदो करणाऱ्या संभाजी भिडेंची सरकार सातत्याने पाठराखण करते, याचा अर्थ सरकार त्यांच्याशी सहमत आहे, असेही ते म्हणाले.

## ...तर भिडे गुरुजींवर कारवाई करू : मुख्यमंत्री

**नागपूर :** मनू हा संत तुकाराम आणि संत ज्ञानेश्वरापेक्षाही श्रेष्ठ होता, असे विधान करणारे शिवप्रतिष्ठान संघटनेचे संस्थापक-अध्यक्ष संभाजी भिडे पुन्हा अडचणीत सापडण्याची शक्यता आहे. संभाजी भिडे यांच्या विधानाची व्हिडीओ क्लीप तपासून पाहू. त्यात असंवैधानिक आढळल्यास कारवाई करू, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी विधानसभेत दिली. अनुयायांना आपल्या मार्गावर चालायला शिकवणारा मनू हा संत तुकाराम आणि संत ज्ञानेश्वरापेक्षाही श्रेष्ठ होता, असे धक्कादायक विधान भिडे यांनी पुण्यात केले होते. मनूला श्रेष्ठ मानणाऱ्या भिडेंवर कारवाई करण्याची मागणी विरोधकांनी केली होती. त्यावर निवेदन देताना मुख्यमंत्र्यांनी कारवाईचा इशारा दिला आहे.

## बेताल वक्तव्य करणाऱ्या भिडेंवर कारवाई करा – अजितदादा

**नागपूर :** माऊली-तुकोबापेक्षा मनू श्रेष्ठ होता, असे बेताल वक्तव्य संभाजी भिडे यांनी केले. हे पुरोगामी महाराष्ट्रासाठी चुकीचे असून, महाराष्ट्रातील जनता हे कदापि खपवून घेणार नाही. या मागील मास्टरमाइंड कोण आहे, हे स्पष्ट करावे आणि तरुणांचे विचार भ्रष्ट करण्याचे काम करणाऱ्या संभाजी भिडे यांच्यावर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानसभेचे गटनेते अजित पवार यांनी केली. माऊली आणि तुकोबांचे विचार सर्व जगाला माहीत आहेत. आपण त्यांच्या विचारांसमोर नतमस्तक होतो; पण कोण तरी संभाजी भिडे येतो आणि माऊली-तुकोबापेक्षा मनू श्रेष्ठ होता, असे बेताल वक्तव्य करतो हे योग्य नाही, असेही अजितदादा म्हणाले. ५७ टक्के लोकांना शूद्र मानणारा मनू श्रेष्ठ कसा? हे आपल्या राज्यात चालणार नाही. यावर राज्य सरकारची भूमिका स्पष्ट व्हायला हवी. मागील वर्षी हे पालखीत तलवारी घेऊन आल्याचे सांगत पाठीराखा कोण आहे? असा सवालही अजित पवार यांनी केला आहे. मनूने सर्वांना अतिशय तुच्छ लेखले होते. समाजातील दोन-तीन टक्केच लोकं चांगली आहेत, असे विचार मनूने सांगितले आहे. तो विचार योग्य नाही, हे सांगण्याचे काम महात्मा जोतिबा फुले यांनी केले. घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपली भूमिका मांडली आणि ती मनुस्मृती जाळून टाकली. त्या मनूला हे गोंजारत आहेत. हे कसले विचार आणले जात आहेत? असा सवालही अजित पवार यांनी केला आहे.

## सभागृहातील अबोला बाहेर चर्चेला!



**नागपूर :** 'कौन आया रे कौन आया, राष्ट्रवादी का शेर आया,' अशा घोषणांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांचे विधानभवन परिसरात कार्यकर्त्यांकडून स्वागत झाले खरे; पण विधानसभेच्या कामकाजादरम्यान भुजबळ हे 'राष्ट्रवादी'त किती प्रिय आहेत हेही बघायला मिळाले. तब्बल तीन तास भुजबळ हे अजित पवार यांच्या बाजूच्या आसनावर होते. मात्र, त्यांच्यात साधी 'डोळाभेट'ही झाली नाही. स्वागत, हास्य व गळाभेट ह्या गोष्टी सोडाच. तथापि, भुजबळ विधिमंडळाच्या कामकाजात लक्ष देत होते. त्यांनी विधिमंडळ डोळ्यातही साठविले.

महाराष्ट्र सदन घोटाळ्याच्या आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी दोन वर्षे तुरुंगात राहून आलेले भुजबळ यांची सोमवारी सकाळी ११ वाजता पावसाळी अधिवेशनात जोरदार एण्ट्री झाली. भुजबळांचे विधानभवनात स्वागत झाल्यानंतर ते विरोधीपक्ष सदस्यांच्या पहिल्या रांगेत जाऊन बसले. एक आसन सोडून उजव्या बाजूला अजित पवार बसून होते. भुजबळ सभागृहात येताच अनेक सदस्यांनी त्यांना आपापल्या जागेवरून नमस्कार केला. बाजूच्या आसनावरील ज्येष्ठ सदस्य गणपतराव देशमुखांनी भुजबळांशी हात मिळवीत चौकशीही केली. मात्र, उजवीकडे बसून असलेल्या अजितदादांनी भुजबळ आल्याची दखलही घेतली नाही. हा प्रसंग पाहून या दोघांमधील अंतर्गत वाद विकोपाला गेल्याची कुजबुज विधानभवन परिसरात दिवसभर होती.

विधिमंडळ कामकाजाचा दुसरा आठवडा सोमवार (९ जुलै) पासून सुरू झाला. सोमवारी भुजबळांची एण्ट्री होताच विधानभवनाच्या मुख्य दारावर विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे, राजेश टोपे, शशिकांत शिंदे, प्रकाश गजभिये यांच्यासह राष्ट्रवादीचे अनेक आमदार, समता परिषदेचे प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत केले. तर विधानसभेच्या प्रवेशद्वारावर त्यांचे स्वागत करण्यासाठी संसदीय कामकाजमंत्री गिरीश बापट आणि शेकापचे नेते व आमदार जयंत पाटील हेदेखील उपस्थित होते. भुजबळ यांच्या या एण्ट्रीने राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, राष्ट्रवादीच्या पहिल्या फळीचे नेते अजित पवार यांनी भुजबळांचे स्वागत करणे तर सोडा, अनेक नेते स्वागतासाठी मुख्य दारावर उभे दिसताच अजितदादा उलट पावलांनी सभागृहाकडे परत जाताना दिसून आले. हे पाहून उपस्थितांच्या भुवया उंचावल्या. सभागृहात प्रवेशाआधी संभाजी भिडेंच्या विषयावर प्रसारमाध्यमांशी बोलताना भुजबळांनी मुख्यमंत्र्यांवर निशाणा साधला. त्यामुळे शेवटी अजित दादांनीही प्रश्नोत्तराच्या तासानंतर सभागृहामध्ये भिडेंचा विषय उपस्थित करीत कारवाईची मागणी केली. मात्र दुपारी ३ वाजतापर्यंत अजित पवार आणि भुजबळ यांनी एकमेकांकडे साधे बघितलेही नाही. हा प्रकार अनेकांना संभ्रमात टाकून गेला.

## मुख्यमंत्र्यांना साप चावला असता तर काय झाले असते?

**नागपूर :** नागपुरात झालेल्या पावसामुळे सगळीकडेच पाणी तुंबले होते. अधिवेशनाचा दिवस वाया गेला. पावसाचे पाणी काढण्यासाठी विधानसभा अध्यक्षांना स्वतः गटारात वाकून बघावे लागले. रामगिरी बंगल्यावर साप निघाला. मुख्यमंत्र्यांना साप चावला असता तर काय झाले असते? आज त्यांना श्रद्धांजली वाहण्याची वेळ आली असती. आजदेखील नागपूर पाण्यात गेले आहे, अशी जोरदार टीका माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.

विधानसभेचे पावसाळी अधिवेशन नागपुरात सुरू आहे. गेल्या आठवड्यात सुरू झालेल्या अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी नागपुरात मुसळधार पाऊस झाला होता. यामुळे विधानभवनात पाणी शिरले होते. तसेच वीजपुरवठाही खंडित झाला होता. त्यामुळे अधिवेशनाचे कामकाज न होताही अनेक नागरिकांचे हाल झाले होते. यावरून अजित पवार यांनी सरकारला लक्ष्य केले. अजित पवार म्हणाले, नागपूरमधील पावसात दिलीप वळसे-पाटील यांच्या गाडीचेही एक चाक पाण्यात अडकले. त्यांना काही झाले असते तर...? अशी स्थिती उद्भवण्यासाठी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांना शासन झाले पाहिजे. जनतेचा पैसा असा वाया जायला नको. विधानसभा अध्यक्ष जसे वाकून बघत होते तसे इतरांनी झाकून ठेवण्याची गरज नव्हती. त्यामुळे पावसाने झालेल्या नुकसानीची चौकशी व्हावी, असे पवार म्हणाले.

## बोंडअळीने पुन्हा बंद पाडले विधानपरिषदेचे कामकाज!

**नागपूर :** पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून विरोधकांनी कापसावरील बोंडअळी आणि धानावरील तुडतुडे रोगासंदर्भातील अनुदानाचा मुद्दा उपस्थित केल्याने सलग चारही दिवस विधानपरिषदेचे कामकाज होऊ शकले नाही. नियमानुसार या मुद्द्यावर चर्चा होऊ शकत नाही, असे सभापतींनी जाहीर करताच, विरोधकांनी गोंधळ केल्याने सोमवारीही परिषदेचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले.

अधिवेशनाच्या चौथ्या दिवशी सोमवारी दुपारी १२ वाजता कामकाजास सुरुवात झाली. प्रश्नोत्तरे पटलावर ठेवल्यानंतर विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांनी बोंडअळी व तुडतुडे रोगाचा मुद्दा उपस्थित केला. मात्र, याबाबत सरकारने निर्णय आधीच जाहीर केल्यामुळे यावर आता चर्चा होऊ शकत नाही, असे मत व्यक्त केल्यानंतर हे सभागृह खोटे बोलण्यासाठी आहे का? असा रोखठोक सवाल करत धनंजय मुंडे यांनी सरकारच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. विरोधकांनी तीन वेळा गोंधळ घातल्याने दिवसभरासाठी कामकाज तहकूब करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## कोकणात स्वतंत्र मत्स्य विद्यापीठ

**नागपूर :** नागपुरात महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ आहे. त्याच धर्तीवर कोकणातही मत्स्य विद्यापीठ स्थापन करण्याची मागणी सोमवारी विधानसभेत करण्यात आली. यासंदर्भात कोकणातील सर्वपक्षीय आमदारांची लवकरच मुख्यमंत्र्यांकडे बैठक बोलावली जाणार असून, शासन याबाबत सकारात्मक असल्याची ग्वाही अर्थ व वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. पुरवणी मागण्यांवरील चर्चेदरम्यान राष्ट्रवादीचे सदस्य भास्कर जाधव यांनी कोकणात मत्स्य विद्यापीठाची स्थापना करण्याची मागणी केली. कोकणाला ७२० किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. येथे मोठ्या प्रमाणात मासेमारी आणि मत्स्य व्यवसाय होतो. नागपुरात पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ आहे. तसेच स्वतंत्र विद्यापीठ कोकणात स्थापन करावे, अशी आग्रही मागणी अन्य सदस्यांनीही केली. भाजपाचे सदस्य आशिष शेलार यांनीही जाधव यांच्या मागणीला समर्थन दिले.

## वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास दहा लाखांची मदत

**नागपूर :** जंगलव्याप्त परिसरात राहणारे नागरिक पर्यावरणाचे रक्षण करण्यात महत्त्वाची भूमिका निभावतात. मात्र, अनेकदा त्यांना वाघ, बिबट्याच्या हल्ल्यात प्राण गमवावा लागतो. अशा मृतकांच्या कुटुंबीयांना आता शासनातर्फे १० लाख रुपयांची मदत दिली जाणार आहे. विधानसभेत पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना अर्थ व वनमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, वाघ किंवा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास पूर्वी ८ लाख रुपये दिले जायचे. आता दहा लाख रुपये दिले जातील.

## माहीम कॉजवे ब्रिजचे स्ट्रक्चलर ऑडिट – प्रवीण पोटे

**नागपूर :** माहीम कॉजवेवरील ज्या पुलाने शहर आणि उपनगर जोडले जाते त्या पुलाचे स्ट्रक्चलर ऑडिट करण्यात येईल, अशी घोषणा सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री प्रवीण पोटे-पाटील यांनी सोमवारी विधानसभेत केली.

वांद्रे आणि माहीम याच्यामध्ये असणाऱ्या माहीमच्या खाडीवरील पुलाने मुंबई शहर व उपनगर जोडले गेले आहे. वाहतुकीच्या दृष्टीने हा पूल अत्यंत महत्त्वाचा असून १८४३ च्या सुमारास हा पूल बांधण्यात आला आहे. या पुलाची गेल्या ७५ वर्षांत फारशी डागडुजी करण्यात आलेली नाही. त्यामुळे या पुलाचे तातडीने स्ट्रक्चलर ऑडिट करण्यात यावे, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे आशीष शेलार यांनी विधानसभेत पुरवणी मागण्यांवर बोलताना केली. मुंबईत वारंवार होत असलेल्या दुर्घटनांचा विचार करता या पुलावर कोणतीही दुर्घटना घडून वित्त व मनुष्यहानी होण्यापूर्वी या पुलाच्या डागडुजीची व स्ट्रक्चलर ऑडिटची आवश्यकता आहे, असेही त्यांनी लक्षात आणून दिले. त्याला उत्तर देताना हा विषय सरकारच्या स्ट्रक्चलर ऑडिट समितीकडे पाठवण्यात आल्याचे राज्यमंत्र्यांनी घोषित केले. मुंबई शहर आणि उपनगर विभागात एनए (ठअ) कर आकारण्यात तफावत असल्याचे शेलार यांनी निदर्शनास आणून दिले. शहर भागात एनए (ठअ) कर आकारण्यात येत नाही. उपनगरात तो आकारण्यात येतो. तो रद्द करण्यात यावा, अशी मागणीही त्यांनी केली. लीज जागेवर देण्यात आलेल्या सीआरझेडमधील गृहनिर्माण सोसायट्यांना अधिकचा एफएसआय अथवा पुनर्विकासाचे फायदे मिळत नसल्यामुळे अशा सोसायट्यांना लीज रेंट कमी करण्यात यावे, कोळी बांधवांना सोलार अथवा बायोगॅसवर मासळी सुकवणारे अद्ययावत यंत्र सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात यावे, वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी प्रस्तावित असलेल्या कल्याण मंडळाची घोषणा या अधिवेशनात करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. महसूल व मत्स्य उद्योग विभागाच्या मागण्यांना उत्तर देताना दोन्ही मंत्र्यांनी या मागण्यांबाबत वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या असून या मागण्यांवर पुढील कार्यवाही करण्यात येत असल्याचे सांगितले.

## महात्मा फुले जीवनदायी व आयुष्यमान योजना एकत्रित करणार – मुख्यमंत्री

**नागपूर :** राज्य सरकारच्या वतीने चालवण्यात येणारी महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना व केंद्र शासनाची आयुष्यमान भारत योजना पुढील काळात एकत्रित करून राबवण्याचा सरकार विचार करत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा लाभ सर्वसामान्य नागरिकांऐवजी विमा कंपन्यांना अधिक झाला, असा प्रश्न विधानसभेचे सदस्य अतुल भातखळकर यांनी उपस्थित केला. या चर्चेत अनेक सदस्यांनी भाग घेतला. यावर माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केंद्र सरकारची आयुष्यमान भारत योजना ही सर्वांना सामावून घेणारी नसल्याने त्याचा फायदा हा केवळ ४० टक्के जनतेला होणार आहे. त्यामुळे महात्मा फुले योजनाच सर्वत्र राबवा, अशी मागणी केली. यावर मुख्यमंत्री म्हणाले, राज्य शासनाच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या योजना संपूर्णतः विमा कंपन्या राबवते. आयुष्यमान भारत आणि महात्मा फुले जीवनदायी योजना एकत्रित केल्यास राज्याला मोठा फायदा होणार आहे. ही एक योजना चालवताना राज्यावर मोठा आर्थिक भार पडतो. त्यामुळे केंद्र सरकार आणि राज्य शासनाची योजना एकत्रित केल्यास राज्यावरील भार कमी होऊन अधिक लोकांना त्याचा फायदा होईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले. विधानसभेचे सदस्य प्रकाश आबीटकर यांनी अनेक रुग्णालयांमध्ये मोठे बिल काढून आर्थिक लूटमार केली जाते. अशांवर फौजदारी गुन्हे नोंदवावे, अशी मागणी केली. त्याला मुख्यमंत्र्यांनी होकार देत, असे गैरप्रकार करणाऱ्यांवर गुन्हे नोंदवण्याची कबुली दिली.


**दोंडाईचे वरवाडे नगरपरिषद, दोंडाईचे जि. धुळे**
**जाहीर ई-निविदा सुचना १३/२०१८-१९**

तमाम वर्ग ४ व त्यावरील वर्गातील सार्वजनिक बांधकाम विभागातील नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदारांना कळविण्यात येते की, सन २०१७-१८ प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत ''राजपथ'' निर्मितीसाठी ''सन २०१७-१८ प्रादेशिक पर्यटन विकास योजने अंतर्गत दोंडाईचा नगरपरिषद परिसरात सौंदर्यीकरण अंतर्गत चौक विकसीत करणे व अनुषंगिक कामे करणे. (नंदुरबार चौक विकसीत करणे व म्युरल चौथराचे काम करणे) च्या कामासाठी मुख्याधिकारी, दोंडाईचे वरवाडे नगरपरिषद, दोंडाईचे ता. शिंदखेडा, जि. धुळे निविदा दरावर टक्केवारी नमुन्यात ई-निविदा मागवित आहे. सदर ई-निविदा शासनाच्या https:// www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन खरेदी व दाखल करता येतील. ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती व अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.
दोंडाईचे नगरपरिषद कार्यालय जा.क्र दो.व.न.प./बांधकाम/२२१०/२०१८ दि. ०५/०७/२०१८

जगदिश पाटील, नगर अभियंता | शिवनंदन राजपूत, नगर अभियंता | डॉ. दिपक सावंत, मुख्याधिकारी | निखीलकुमार जाधव, सभापती
रविंद्र उपाध्ये, उपाध्यक्ष | सौ. नयनकुवर जितेंद्रसिंह रावल, अध्यक्षा
दोंडाईचा वरवाडे नगरपरिषद, दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे

**दोंडाईचे वरवाडे नगरपरिषद, दोंडाईचे जि. धुळे**
**जाहीर ई-निविदा सुचना १४/२०१८-१९**

तमाम वर्ग ४ व त्यावरील वर्गातील सार्वजनिक बांधकाम विभागातील नोंदणीकृत व अनुभवी अशासकीय संस्था यांना कळविण्यात येते की, सन २०१७-१८ स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत स.नं. १५३ जागेवरील नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारणे करीता, मुख्याधिकारी, दोंडाईचे वरवाडे नगरपरिषद, दोंडाइचे ता. शिंदखेडा जि. धुळे परसेंटेज नमुन्यात ई-निविदा प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर ई-निविदा शासनाच्या https:// www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन खरेदी व दाखल करता येतील. ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती व अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.
दोंडाईचे नगरपरिषद कार्यालय जा.क्र दो.व.न.प./बांधकाम/२२६५/२०१८ दि. ०९/०७/२०१८

जगदिश पाटील, नगर अभियंता | डॉ. दिपक सावंत, मुख्याधिकारी | निखील जाधव, सभापती
रविंद्र उपाध्ये, उपाध्यक्ष | सौ. नयनकुवर जितेंद्रसिंह रावल, अध्यक्षा
दोंडाईचा वरवाडे नगरपरिषद, दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे

asianpaints

एशियन पेंट्स लिमिटेड
सीआयएन : L24220MH1945PLC004598
नोंदणीकृत कार्यालय : ६अ, शांतीनगर, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५
संकेतस्थळ : www.asianpaints.com; ई-मेल: investor.relations@asianpaints.com
दूरध्वनी क्र. : (०२२) ६२१८ १००० फॅक्स क्र. : (०२२) ६२१८ १११९

**सूचना**

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिसक्लोजर रिक्वायर्मेंट्स) नियम, २०१५ मधील नियम ४७ सोबत वाचले असता नियम २९ अन्वये ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, खालील बाबी विचारात घेण्याकरिता तसेच मंजुरीसाठी मंगळवार, २४ जुलै, २०१८ रोजी कंपनीच्या संचालक मंडळाची सभा होणार आहे:

१. ३० जुन, २०१८ रोजी संपलेल्या तिमाही करिता कंपनीचे लेखापरीक्षित स्वतंत्र वित्तीय निष्कर्ष; आणि
२. ३० जुन, २०१८ रोजी संपलेल्या तिमाही करिता कंपनीचे अलेखापरीक्षित एकत्रिकृत वित्तीय निष्कर्ष.

जेथे कंपनीची समभाग नोंदणी आहे अशा स्टॉक एक्स्चेंजच्या बीएसई लिमिटेड (www.bseindia.com) आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (www.nseindia.com) च्या वेबसाईटवर आणि कंपनीच्या वेबसाईटवर (www.asianpaints.com) देखील ही सूचना उपलब्ध आहे.

एशियन पेन्ट्स लिमिटेडच्या वतीने आणि करिता
स्वाक्षरी/-
के बी एस आनंद
व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ

ठिकाण : मुंबई
दिनांक : ९ जुलै, २०१८

ऑफर पुण्य नगरी ऑफर
APPOINTMENT
ऑफर साईज १० X ८ Sq.Cm.
आता सवलतीच्या दरात

| | |
|---|---|
| मुंबईसह कोकण विभाग | रु. ३५००/- |
| पश्चिम महाराष्ट्र | रु. ३५००/- |
| उत्तर महाराष्ट्र | रु. ३५००/- |
| मराठवाडा विभाग | रु. ३५००/- |
| विदर्भ | रु. ३५००/- |
| कोणतेही दोन विभाग | रु. ५०००/- |
| कोणतेही तीन विभाग | रु. ७७००/- |
| कोणतेही चार विभाग | रु. १०५००/- |
| संपुर्ण महाराष्ट्र | रु. १३०००/- |

वरील जाहिरातीच्या रकमेवर 5% जीएसटी कर वेगळा द्यावा लागेल.
स्पेशल दिवस : बुधवार/शनिवार
जाहिरातीसाठी फक्त एक मिस कॉल करा 18001206252
E-mail:customercare@sapp.in